# शेळीपालन एक उत्तम कृषी पूरक व्यवसाय

डॉ. अश्विनी मुखेकर
सहाय्यक प्राध्यापिका (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग)
डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे

दिवसेंदिवस शेळीच्या मांसाची वाढती मागणी व कमी खर्चातील व्यवसाय यामुळे शेळीपालन जोडधंदा नसून हा एक स्वतंत्र फायदेशीर व्यवसाय ठरत आहे. त्यामुळे आजचा शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार तरुण, मोठे उद्योजक शेळीपालनाकडे आकर्षित होत आहेत.

जगात एकूण ८६१.९ दशलक्ष शेळया असून त्यांपैकी १४८.९ दशलक्ष शेळया भारतात आहेत. म्हणजेच जगाच्या १७ टक्के शेळया भारतात आहेत. शेळ्यांच्या संख्येत भारत हा जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशातील एकूण दूध उत्पादनापैकी 3 टक्के दूध एकूण मांस उत्पादनापैकी ३७ टक्के मांस शेळ्यांकडून मिळते. तसेच १०१ दशलक्ष किलो कातडी शेळ्यांपासून मिळते.

### शेळीपालनाचे फायदे:

१) शेळी ही गरिबाची गाय म्हणून ओळखली जाते. कारण गाई-म्हशीच्या तुलनेत कमी जागा, कमी खाद्य व कमी पाणी लागते.

२) अल्प गुंतवणुकीने हा व्यवसाय केला जाऊ शकतो.

३) संगोपन करण्यास सोपे असते. लहान मुले, महिला, म्हातारी व्यक्तीसुद्धा संगोपन करू शकते.

४) शेळ्या काटक असून कोणत्याही हवामानाशी जुळवून घेतात. त्यामुळे रोगराईचे प्रमाण फारच कमी असते.

५) शेळया निकृष्ट प्रतीच्या चाऱ्याचे मांसात किंवा दुधात रूपांतर करतात. शेळ्यांना झाडाझुडपांचा पाला ओरबडून खाणे आवडते. शेळ्या बाभूळ, गुंज, सुबाभूळ, पिंपळ बेल, बोर, कडूलिंब, इत्यादी झाडाझुडपांचा पाला खातात, तसेच बरसीम, चवळी, लुसर्न, वाटाणा, हरभरा अशी नत्रयुक्त वैरण, तसेच गवत, मका, ज्वारी, कडबा, ओट यांची लागवड केल्यास बराचसा खाद्याचा प्रश्न सुटतो. गाईच्या तुलनेत शेळीला एकपंचमाश चारा लागतो.

६) टाकाऊ अन्न, भाजीपाल्यातील टाकाऊ भाग, मुळा, गाजर, कोबी यांचा पाला इत्यादी शेळ्यांच्या खाद्यासाठी वापरता येतो.

७) दूध पचनास हलके व पौष्टिक असते. म्हशी व गाईच्या दुधात स्निग्ध पदार्थ जास्त असतात. शेळीच्या दुधाचा आयुर्वेदिक म्हणून उपयोग करतात.

८) शेळीचे दोन वेतांतील अंतर कमी असून शेळ्या २ वर्षात तीनदा विता. ते ३ करडे देतात. तसेच ५ ते ६ महिन्यात नर पिले विक्रीसाठी तयार पिल्ले एक वर्षाच्या आत माजावर येतात.

९) आपल्या देशात गोमांस खाण्याचे प्रमाण कमी असल्यामुळे शेळीच्या मासाला मागणी आहे. मागणी भरपूर असल्यामुळे शेळ्या कितीही पाळल्या भरपूर आहे.

१०) पैशाची आवश्यकता पडल्यास त्वरित काही शेळ्या विकून पैसा उभा केला जाऊ शकतो.

११) पश्मिना, अंगोरा, गद्दी जातीच्या शेळ्यांपासून लोकर मिळते. त्यापासून पग घोंगड्या, शाली इत्यादी वस्तू तयार करता येतात.

१२) शेळ्यांच्या शिंगापासून व खुरांपासून डिंकयुक्त पदार्थ बनवितात.

१३) शेळ्यांच्या कातडीला सतत बाजारपेठ उपलब्ध असते. कातडीपासून बॅग, चप्पल व इतर वस्तूंचा विक्रीव्यवसाय केला जातो.

१४) शाकाहारी अन्नात कमी असणारे अमिनो आम्ल उदाहरणार्थ, लायसिन, मिथिओनीन व ट्रिप्टोफॅन शेळीच्या मांसात अधिक असते.

१५) इतर प्राण्यांच्या तुलनेत शेळ्यांचे प्रजनन उत्तम आहे. कारण शेळीमध्ये माजावर येणे, माजातील अनियमितपणा किंवा गाभण न राहणे या गोष्टी फारच कमी प्रमाणात आढळतात.

१६) शेळी गाभण काळ १५० दिवस असतो. व्याल्यानंतर पुन्हा २१ दिवसांनी शेळी पार माजावर येते.

१७) शेळीपासून शेतीसाठी मौल्यवान लेंडीखतही मिळते.

१८) व्यवसायात गुंतवणूक केलेले भांडवल हमखास नफ्यासहीत आपल्याला परत मिळते.

**शेळ्यांच्या जाती:** भारतात शेळीच्या प्रमुख २५ जाती आढळतात.

#### (अ) देशी जाती:

- हिमालयातील थंड हवामानाच्या प्रदेशात असणाऱ्या शेळ्या- काश्मिरी, पश्मिना, गद्दी.
- उत्तर पश्चिम भारतामध्ये असणाऱ्या शेळ्यांच्या जाती- जमनापरी, बारबेरी, बीटल.
- मध्य भारतामध्ये असणाऱ्या शेळ्यांच्या जाती- मारवारी, महिसाना, झलवाडी, काठेवाडी.
- दक्षिण भारतामध्ये असणाऱ्या शेळ्यांच्या जाती- सुरती, उस्मानाबादी, संगमनेरी, मलबारी.
- दापोली येथील कृषि विद्यापीठाने कोकणासाठी कोकण कन्याळ ही जात विकसित केली आहे.

#### (आ) विदेशी जाती:

अल्पाईन, अँग्लोन्यूबियन, सानेन, टोगेनबर्ग, अंगोरा, बोअर. विदेशी जातीच्या बोकडाचे वजन १०५ ते १३५ किलोपर्यंत वाढते.

(संपर्क: +९१ ७२१८०८३९४९)

★ ★ ★